MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI

Pulse & Oilseed Crops Research and Training Centre, Pandharpur

1. Name & complete address of Research Centre:

Pulse & Oilseed Crops Research and Training Centre, MPKV, Korti Road, Pandharpur Dist. Solapur-413 304

2. Year of Establishment:

10^{th} June 1981

3. Major Objectives/ Mandates for establishment of Research Centre:

- To develop the technology for Pulse and Oilseed crops either as pure crop or inter or sequence crop in irrigated farming system.
- To organize basic research which may help to evaluate and stabilize the yield of Pulse and Oilseed crops.
- To execute the basic research work so as to increase the production of fruits, vegetables and floricultural crops.
- Transferring the available knowledge to the farmers in irrigated area of Bhima and Nira command area.

4. Historical Background:

The Pulse and Oilseed Crops Research and Training Centre, MPKV, Pandharpur Dist. Solapur was started on **10^{th} June, 1981 under Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri,** funded by Indian Council of Agricultural Research (ICAR) for increase in the production of Pulse and Oilseed Crops in Bhima and Nira Command area. Then it was funded by State Government from 29^{th} March, 2006. The total area of 12 hectares from Taluka Seed Farm Pandharpur was taken on lease basis from the State Department of Agriculture for the purpose of research. Since 1981 several recommendations & varieties were released, made available and transferred to the farmers. The Research station comes under scarcity zone is 3.0 km away from Pandharpur City at 18^{0}N latitude and 75^{0}E longitude with altitude, 463 meters form mean sea level with average rainfall of 610 mm, Min-Max Temp. of 8.4^{0}C to 42.8^{0}C. Due to un even and scattered type of rainfall situation and as per the farmers demand this research station started research under Pulse and Oilseed Crops specially on Arid legume Cowpea crop and released four varieties of cowpea viz., Phule Pandhari, Phule Vithai, Phule Rakhumai and Phule Sonali. Similarly, more than twenty-four recommendations made for the benefit of dry land farmers and those are under cultivation on farmers field.

5. Details of the sanctioned posts:

Sr. No.	Designation	Discipline	Sanctioned post	Filled post	Vacant post	Total	Remarks
1	**Scientific Staff**						
I	Assit. Prof.	Botany	01	01	00	01	
Ii	Assit. Prof.	Horticulture	01	00	01	01	
Iii	Assit. Prof.	Pl. Pathology	01	00	01	01	
2	**Technical Staff**						
I	Sr. Res. Assistant.	Entomology	01	00	01	01	
		Extension	01	00	01	01	
Ii	Agril. Assistant		03	03	00	03	One post pooled at Sorghum Project, MPKV, Rahuri
3	**Supporting staff**						
I	Sr. Clerk		01	01	00	01	
Ii	Jr. Clerk / Typist		01	01	00	01	
Iii	Peon		01	00	01	01	
Iv	Watchman		01	01	00	01	
V	Jeep Driver		01	00	01	01	
		Total	**13**	**07**	**06**	**13**	

6. Significant / innovative activities and programmes implemented by the Research Centre:

- Installation of separate electric DP for regular supply of electricity to office
- Renovation of office building
- Renovation of electricity in office building and guest house
- Deepening and Construction of well
- 100 meter Barbed Wired Fencing in front side of the Farm
- Installation of Arc Gate on Main road
- Installation of 7.5 HP Solar pump in bore well
- Installation of three Solar High mast near office and farm road
- Conducting Product Testing Trials for generating revenue receipts
- Installation of Automatic Weather station
- Farmers Rally, Field Day, Training programmes organized for farmers every season.

7. Major improved/ hybrid varieties, agriculture technologies developed at Research Centre:

- The four popular cowpea varieties viz., Phule Pandhari, Phule Vithai, Phule Rakhumai and Phule Sonali were developed by this Centre for general cultivation to the farmers.
- Through the assessment of varieties led to the release and recommendation of following cultivars of different crops for different agro-climatic regions in last five years.

  1. Phule Vishwaraj of chickpea 2020
  2. Phule Sarita of Moth bean 2020

3. Phule Vasu of black gram 2021
4. Phule Rajan of black gram 2022
5. Phule Trupti of Pigeon pea 2023

8. Major agricultural technological recommendations released by Research Centre:

- Scheduling of irrigations to tail enders of Nira canal where irrigation during kharif and summer seasons are uncertain, the crops sequences of Tur - Tur ratoon (ICPL-87) -- Pearl millet (fodder) Giant bajra OR kharif fallow -- rabi sorghum (Swati) -- late summer groundnut (Phule pragati) was recommended
- For Bhima and Nira command area two crop sequences of kharif groundnut (Phule pragati) and rabi sorghum (Swati) OR sunflower (EC-68414) in kharif and sorghum (Swati) in rabi was recommended
- For Bhima and Nira command area where rabi sorghum is a predominant crop the week of March coupled with spreading variety K-4-11 or semi-spreading varieties ICGS-11 and UF-70103 or third week April coupled with bunch type variety Phule pragati were recommended for cultivation of summer groundnut grown after rabi sorghum
- Application of irrigations at critical growth stages of safflower (Bhima) crop i.e. at rosette stage (30-35 DAS), flowering (60-65 DAS) and grain filling (80-90 DAS) was recommended
- Improved management practices with two irrigations are at 35 and second at 70 DAS for gram was recommended when one irrigation was available the irrigation scheduled at 35 DAS i.e. at flowering stage was recommended for gram
- For production of highest yield of mustard in Bhima and Nira commanded area, the fertilizer dose of 80 kg N/ha + 30 kg P_2O_5/ha was recommended
- For maintaining the better fertility status the crop sequences of kharif soybean or groundnut with rabi jowar is recommended for Bhima and Nira command area
- Seed treatment with thiram 2.0 gm + carbandazin 2.0 gm per kilo gram of seed is recommended for control of gram wilt
- Intercropping of two lines of Groundnut in Tur No. 148 or Vishakha under irrigated conditions gave more profit.
- Intercropping of two lines of Sunflower in Tur gave more profit.
- Application of 2 kg Boron per ha at the time of kharif groundnut sowing under irrigated conditions increased the yield by 7-8%.
- For irrigated gram cultivation, plant population of 3.33 lakh/ha with 30 cm row distance and sowing in plane bed is beneficial to increase the yield.
- Seed treatment with biofertilizer rhizobium helps to increase the yield 20% in gram. Also shows 50% reduction in nitrogen fertilizers.

9. Future Road map of the research:

- To develop Early maturity, High grain yield, better grain character, Erect growth habit, Non- trailing/ Determinate and bushy types, Suitable for various cropping situations, Pest and Disease resistance genotypes of cowpea
- Cowpea Germplasm Collection, Evaluation & Maintenance and develop new varieties
- Conducting Hybridization Programme and Evaluation of F_1, F_2, F_3, F_4, F_5 and advanced generations of cowpea
- To conduct basic research to increase Pulse & Oilseed crops yield
- To undertake Breeder and Truthful seed production programme of Pulse & Oilseed crops
- Research on integrated pest and disease management
- To study pest and diseases of pulse & oilseed crops and their management
- Research on fruit, vegetable and flowering plants in Bhima and Nira command area

10. Measures required for improvement / strengthening of the Research Centre:

- Station having one old tractor. Needs one New Tractor for effective farm cultivation.
- Station doesn't have sanctioned post of permanent labour. Needs three to four permanent labours on top priority.
- Renovation of Farm roads inside the station.
- Non availability of sufficient irrigation facility for research and seed production. Permanent source of Irrigation facility is needed.
- Station having 50% vacant posts. Needs technical staff on top priority
- Plastic paper of farm pond has leakages so storage & use not possible

11. Photographs (jpeg) of historical and innovative activities of the Research Centre:

अँकर STORY

जादा उत्पन्न देणाऱ्या चवळीचा पंढरपुरात शोध

शेतकऱ्यांचा फायदा होणार

पंढरपूर : शरीराची रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी डॉक्टरांकडून मटकी, मूग, चवळी, वटाणा, हरभरा अशी कडधान्ये खाण्याचा सल्ला दिला जात आहे. यामुळे या कडधान्यांना बाजारात मागणी असल्याने शेतकरी कडधान्याचे उत्पादन घेऊ लागला आहे. पंढरपुरातील कडधान्य संशोधन केंद्रात चवळी फुले सोनाली या नवीन वाणाची निर्मिती करण्यात आली आहे. या नवीन वाणाची रोग प्रतिकारक शक्ती जास्त असून हेक्टरी जादा उत्पन्न निघते. यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याची माहिती संशोधक डॉ.रमेश बदाने यांनी दिली.

महात्मा जोतीबा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत शेतकऱ्यांनी चांगल्या दर्जाची बियाणे मिळावीत यासाठी संशोधन केले जात आहे. पंढरपूर-कोर्टी रस्त्यावर या विद्यापीठा अंतर्गत कडधान्य संशोधन केंद्र सुरू करण्यात आले असून येथे नवीन वाणाची निर्मिती केली जाते. चवळीस चांगली मागणी असल्याने या केंद्रात चवळीचे जादा उत्पन्न मिळविण्यासाठी संशोधन करण्यात आले. संशाधनातून फुले सोनाली हे नवीन वाण तयार करण्यात आले. ही चवळी अंतरपिकात घेता येत असून तिची रोग प्रतिकारकशक्ती जास्त असल्याने शेतकऱ्यांना औषध फवारणीचा खर्च करावा लागत नाही. या वाणासाठी कमी पाणी असले तरी चालते. कमी पाण्यावर हेक्टरी १५ क्विंटल, पावसाच्या पाण्यावर २० तर पाण्याची सोय असल्यास २५ क्विंटल उत्पादन निघते.

फुले सोनाली बियाणे

फुले सोनाली या चवळीचे पिक बारमाही घेता येत असून ७० दिवसात चवळीचे उत्पन्न निघते. या चवळीची बुटकी जात असून याच्या लागवडीमुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या चवळीस शासनाने मंजूरी दिली असून केंद्राची मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. केंद्राने मंजुरी देताच देशभर याची लागवड होणार आहे. हे वाण शेतकऱ्यांना वरदान ठरणार असल्याचे डॉ.बदाने यांनी सांगितले.

Visit of Dr. S. R. Gadakh sir, DOR, MPKV, Rahuri visited on 22.9.2021

News about cowpea variety Phule Sonali in local Newspaper

Chickpea Field Day organized on 18th January 2022

संशोधन केंद्रात शेतकऱ्यांना ३५ प्रकारची पिके पाहण्याची संधी

पंढरपूर / अनिरुद्ध बडवे

माहिती तंत्रज्ञानामुळे नवनवीन शोध लागत आहेत. याचा वापर करून शेतीमध्ये पिकांची लागवड करताना दर्जेदार बियाणांची पेरणी शेतकऱ्यांनी करावी म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठाने ३५ प्रकारची बियाणे तयार केली असून त्याची लागवड पंढरपुरातील संशोधन केंद्रात केली आहे. याची पाहणी करण्याची संधी शेतकऱ्यांना देण्यात आली असल्याची माहिती शास्त्रज्ञ रमेश बदाणे यांनी दिली.

पंढरपूर-कोर्टी रोडवर कडधान्य व तेलबिया संशोधन केंद्र असून येथे चांगल्या दर्जाची रब्बी हंगामातील ३५ प्रकारची पिकांची लागवड करण्यात आली आहे. यात गहू, ज्वारी, हरभरा, घेवडा, सुर्यफूल, करडाई, भेंडी आदींचा समावेश आहे. शेतकरी पारंपारीक बियाणाचा वापर करीत असल्याने पिकांवर किड पडते तसेच उत्पन्न कमी मिळते. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी यांनी संशोधन करून दर्जेदार बियाणांची निर्मिती केली आहे. याची लागवड पंढरपूर येथील संशोधन केंद्रात करण्यात आली असून पिक चांगल्या प्रकारचे आले आहे.

या नवीन बियाणांची माहिती शेतकऱ्यांना व्हावी म्हणून संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या बियाणांबाबत शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना माहिती देणार आहेत.तरी शेतकऱ्यांनी संशोधन केंद्रास भेट देऊन शेतात दर्जेदार बियाणाची लागवड करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

Rabi 2021-22 Demonstration plot of MPKV released varieties and its news in local Newspaper

Visit of RAWE students of different Agril. Colleges during 2022-23

Visit of Hon’ble Dr. P. G. Patil sir, Vice Chancellor, MPKV, Rahuri on 23.6.2022

Visit of Shri. Dattatray Ugile, EC member, MPKV, Rahuri on 1st August 2022

Visit of Shri.Pramod Lahale, Registrar, MPKV, Rahuri on 25.11.2022

Farmers Rally & Chickpea Field Day organized on 10th January 2023

Visit of Prof. Arun Bhosale & 40 DAESI Trainees at POCRTC, Pandharpur on 8.12.2023

Rabi 2023-24 Chickpea Field Day organized on 24th January 2024

Farmers Rally organized & nearly 100 farmers participated in the rally on 23.03.2024

Agril. Exhibition & Rally organized during Aashadi Ekadashi every year

यात्रा कालावधीत भक्ती-किसान शक्तीचा संगम

१ हजार शेतकऱ्यांची राहुरीच्या कृषी प्रदर्शनास भेट

पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : आषाढी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी १५ लाखाहून अधिक भाविक दाखल झाले होते. यात्रेत आलेल्या भाविकात अनेकजण शेतकरी असतात. यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांना राहुरी कृषी विद्यापीठाने तयार केलेल्या नवनवीन बियांणा संदर्भात माहिती देण्यासाठी पंढरपुरातील कोर्टी रोडवर असलेल्या तेलबिया संशोधन केंद्रात कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. १ हजार भाविकांनी प्रदर्शनास भेट देवून माहिती घेतली.

शेतकरी पारंपारिक पध्दतीने शेती करतो. यामुळे पिकाचे उत्पन्न कमी मिळते. जास्त उत्पन्न देणारी कडधान्ये, तेलबिया, तृणधान्य राहुरी कृषी विद्यापीठाने तयार केली आहेत. याची माहिती भाविक शेतकऱ्यांना व्हावी म्हणून आषाढी यात्रा कालावधीत कोर्टी रोडवरील तेलबिया संशोधन केंद्रात कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेतकऱ्यांना नवीन जातीची बियाणे व लागवड केलेली बियाणे दाखविण्यात आली.शेतकऱ्यांनी कशा पध्दतीने लागवड केल्यास जास्त उत्पादन मिळते याची माहिती शास्त्रज्ञ डॉ. रमेश भदाणे यांनी दिली. सुमारे १ हजार शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनास भेट दिली. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी रामचंद्र बनसोडे, लक्ष्मण नरोटे, विकास काळे, संतोष देशमुख, समाधान गवळी, सोमनाथ वागज, श्री. कोटगिकर यांनी प्रयत्न केले.

कृषी प्रदर्शन पाहिल्यानंतर शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त करण्यात आले. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून भक्ती व किसान शक्तीचा संगम झाला असल्याचे दिसून आले.

पंढरी संचार

Visit of GOrantiwar sir on 14.12.2024

Sunhemp green manuring





Finger Millet Field Day, Farmers Rally, Shivar Feri organized on 10.10.2024

Installation of Solar High Mast at POCRTC, Pandharpur

Renovation of office building, colouring and electricity completed

Well Deepening and construction of pardi at POCRTC, Pandharpur

Installation of Arc & gate at entrance of the POCRTC, Pandharpur

Installation of Solar Pump at POCRTC, Pandharpur on 2.12.2024

Dr. R. S. Bhadane delivered lecture as a Resource Person in the Zonal Workshop for KVK Scientists at AAU, Anand on 7-9 July 2022

Dr. R. S. Bhadane participated in Hyperspectral Training during 2-6.12.2024

Some extension activities by scientist from POCRTC, Pandharpur

ॲग्रो प्लॅनिंग

सकाळ ॲग्रोवन

तंत्र उन्हाळी भुईमूग लागवडीचे

ॲग्रोवन

अधिक उत्पन्नासाठी हरभरा पिकाचा विचार करा : डॉ. भदाणे

पंढरपुरातील टाकळीत शेतकऱ्यांसाठी 'हरभरा दिवस' साजरा

ॲग्रोवन वृत्तसेवा

पंढरपूर, जि. सोलापूर : "रब्बी हंगामासाठी हरभरा हे कडधान्य पीक शेतकऱ्यांसाठी आर्थिक तसेच शेतीचा पोत सुधारण्यासाठी खूप फायदेशीर आहे. कमी खर्च आणि अधिकच्या उत्पन्नासाठी हरभरा पिकाचा विचार शेतकऱ्यांनी करावा. त्याचे आहारातील महत्त्वही मोठे आहे," असे प्रतिपादन टाकळी येथील तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. रमेश भदाणे यांनी केले.

टाकळी येथील तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राच्या वतीने नुकताच 'हरभरा दिवस' साजरा करण्यात आला. या प्रसंगी पंढरपूर परिसरातील शेतकऱ्यांसह मोहोळ येथील कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. तानाजी वळकुंडे, उपविभागीय कृषी अधिकारी सर्जेराव तळेकर, तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे या वेळी उपस्थित होते.

भदाणे म्हणाले, "पंढरपूर भागात ऊसशेती अधिक होते, उसामध्ये आंतरपीक म्हणून हरभरा पिकाचा पर्याय होऊ शकतो."

शिवारफेरीतून प्रत्यक्ष अनुभव

तृणधान्य वर्षाचे औचित्य साधत शेतकऱ्यांसाठी संशोधन केंद्रावर हरभरा दिवस व शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले. या वेळी उपस्थित शेतकऱ्यांना हरभरा पिकाची लागवड, पूर्वमशागत, सुधारित वाण, कीड व रोग व्यवस्थापन, काढणी व काढणीपश्चात तंत्रज्ञान, उपपदार्थ बनविणे, विक्री व्यवस्थापन व पिकाचा नफा तोटा इत्यादीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सोलापूर : टाकळी-पंढरपूर येथील तेलबिया पिके संशोधन केंद्रात आयोजित शिवारफेरीत हरभरा पिकाविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

Solapur Main
21/01/2023 Page No. 6

रब्बी हंगामासाठी हरभरा पीक शेतकऱ्यांना फायदेशीर : डॉ. भदाणे

पंढरपूर संशोधन केंद्रावर हरभरा दिवस साजरा

पंढरपूर : रब्बी हंगामासाठी हरभरा हे कडधान्य पीक शेतकऱ्यांसाठी आर्थिक तसेच शेतीचा पोत सुधारण्यासाठी खूप फायदेशीर असल्याचे मत कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूरचे प्रभारी अधिकारी डॉ. रमेश भदाणे यांनी व्यक्त केले.

जागतिक तृणधान्य वर्षाचे औचित्य साधून संशोधन केंद्रावर हरभरा दिवस व शिवार फेरी आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्त परिसरातील उपस्थित शेतकऱ्यांना हरभरा पिकाबद्दल शेतीची लागवड, पूर्वमशागत, लागवड पद्धती, सुधारित वाण, कीड व रोग व्यवस्थापन, काढणी व काढणीपश्चात तंत्रज्ञान, उपपदार्थ बनवणे तसेच विक्री व्यवस्थापन व पिकाचे नफा तोटा इत्यादीबाबत सखोल तांत्रिक मार्गदर्शन व परिसरातील ऊस शेतीमध्ये आंतरपीक म्हणून हरभरा पिकाचे महत्त्व विशद करण्यात आले. शिवार फेरी वेळी रब्बी हंगामातील हरभरा, करडई, सूर्यफूल, गहू, ज्वारी, भुईमूग, चवळी इत्यादी पिकांच्या एकूण ४० विविध वाणांचे पीक प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवून त्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. हरभरा पिकाची सरासरी उत्पादन वाढीसाठी संशोधन केंद्रावर राबवण्यात आलेल्या हरभरा बीज उत्पादन कार्यक्रमाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

तसेच डॉ. तानाजी वळकुंडे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ यांनी नवीनच प्रसारित फुले विश्वराज, फुले विक्रांत या हरभरा वाणांची माहिती व महात्मा फुले कृषी विद्यापीठ मार्फत शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात येणाऱ्या बीज उत्पादन कार्यक्रमाची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

यावेळी पंढरपूर उपविभागीय कृषी अधिकारी सर्जेराव तळेकर, पंढरपूर तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी या संशोधन केंद्रावर कार्यरत कर्मचारी सर्वश्री रामचंद्र बनसोडे, लक्ष्मण नरोडे, समाधान गवळी, संतोष होटगीकर, विकास काळे, संतोष देशमुख, सोमनाथ वागज उपस्थित होते.

तेलबिया पिकांची लागवड करण्याचे कुलगुरूंचे आवाहन

अॅग्रोवन

भरधान्याच्या मूल्यवर्धनातून पूरक उद्योगाला संधी

डॉ. आर. एस. भदाणे : कृषी विज्ञान केंद्रात तंत्रज्ञान महोत्सव

अॅग्रोवन वृत्तसेवा

सोलापूर : यंदाचे वर्ष पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यात भरडधान्य हा घटक महत्त्वाचा आहे. त्यात पारंपारिक भरडधान्याचे मूल्यवर्धन केल्यास चांगले उत्पन्न मिळू शकते. विशेषतः तरुण शेतकऱ्यांना पूरक उद्योगासाठी मोठी संधी त्यातून मिळेल, असे मत पंढरपूरच्या कडधान्य, तेलबिया पीक संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. आर. एस. भदाणे यांनी व्यक्त केले.

मोहोळच्या कृषी विज्ञान केंद्रात आयोजित कृषी तंत्रज्ञान महोत्सवात तरुण शेतकऱ्यांसाठी आयोजित मेळावा आणि शिवारफेरीप्रसंगी डॉ. भदाणे बोलत होते. जिल्हा रेशीम विकास अधिकारी पी. व्ही. पावस्कर, सोलापूरचे खादी ग्रामोद्योग मंडळाचे अधिकारी पी. के. पलवेंचा, मोहोळ येथील कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. विठ्ठल पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे हे उपस्थित होते.

डॉ. भदाणे म्हणाले, की पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व ओळखूनच जागतिक पातळीवर हे वर्ष साजरे केले जात आहे. शेतीत ही पिके महत्त्वाची आहेत, पण आहारातील त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अलीकडे त्याबाबत जागरूकता निर्माण होत आहे. त्यामुळे त्याच्या बाजारपेठेचा विचार करता मूल्यवर्धनातून चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. वळकुंडे यांनी तरुण शेतकऱ्यांनी नवीन पिकांच्या वाण, शिफारशी, शेती तंत्रज्ञान, कृषी पूरक उद्योग-व्यवसायाविषयी माहिती घेण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रात कधीही या, आम्ही मदत करू, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर शिवारफेरीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश क्षिरसागर यांनी केले.

सोलापूर : मोहोळच्या कृषी विज्ञान केंद्रात आयोजित कृषी तंत्रज्ञान महोत्सवात डॉ. आर. एस. भदाणे यांनी मार्गदर्शन केले.

तांत्रिक चर्चासत्रांना प्रतिसाद

तांत्रिक सत्रात पावस्कर यांनी रेशीम उद्योगासाठी शासकीय योजनांची माहिती दिली. श्री. पलवेंचा यांनी किफायतशीर मधुमक्षिका पालनाबाबत मार्गदर्शन केले, तर श्रीमती काजल म्हात्रे यांनी नैसर्गिक शेतीबाबत, दिनेश क्षिरसागर यांनी अन्न प्रक्रिया उद्योग, डॉ. पंकज मडावी यांनी जैविक कीड व रोग व्यवस्थापनबाबत, डॉ. सूरज मिसाळ यांनी बदलत्या हवामान आधारित शेती पद्धती या विषयावर सादरीकरण केले. या सर्वच सत्रांना शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

Solapur, Main
12/02/2023 Page No. 6

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूर

१.	**संशोधन योजना / केंद्राचे नाव व पुर्ण पत्ता**	कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, म. फु. कृ. वि., कोर्टी रोड, पंढरपूर जि. सोलापूर ता. पंढरपूर, जि. सोलापूर- ४१३ ३०४ ई-मेल आयडी: ars81pandharpur@gmail.com
२.	**स्थापना वर्ष**	१० जून १९८१

३. संशोधन योजना / केंद्र स्थापनेबाबतचा प्रमुख उद्देश्य

- बागायती क्षेत्रासाठी कडधान्य व तेलबिया पिकांच्या उत्पादन वाढीसाठी सलग पीक, आंतरपीक किंवा क्रमवार पीक पद्धती साठी नवीन तंत्रज्ञान विकसित करणे.
- कडधान्य व तेलबिया पिकांच्या उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने मूलभूत संशोधन करणे.
- फळपिके, भाजीपाला व फुलझाडे पिकांच्या उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने मूलभूत संशोधन करणे.
- वेगवेगळ्या विस्तार माध्यमातून नीरा आणि भीमा लाभ क्षेत्रामधील शेतकऱ्यांना विकसित तंत्रज्ञान बद्दल माहिती पुरविणे.

४. ऐतिहासिक पार्श्वभुमी

कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, म. फु. कृ. वि., पंढरपूरची स्थापना १० जून १९८१ साली भारतीय कृषि संशोधन संस्था, नवी दिल्लीच्या अनुदानातून झाली. सुरवातीचा उद्देश्य नीरा आणि भीमा लाभ क्षेत्रामधील कडधान्य व तेलबिया पिकांच्या उत्पादन वाढविण्याचा होता. त्यानंतर २९ मार्च २००६ पासून राज्य सरकार या केंद्राचे अनुदान देते. एकूण १२.० हेक्टर तालुका बीज गुणन क्षेत्र कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून करार पद्धतीने (Lease basis) संशोधन उद्देशाने घेण्यात आले. सन १९८१ पासून आजपर्यंत वेगवेगळे शिफारशी आणि नवीन वाण या संशोधन केंद्राने विकसित करून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या आहेत. हे संशोधन केंद्र अवर्षण प्रवण क्षेत्रात येत असून पंढरपूर शहरापासून ३.० किमी अंतरावर १८° N अक्षांश आणि ७५° E रेखांश समुद्र सपाटीपासून ४६३ मीटर उंचीवर असून सरासरी पाऊसमान ६१० मिमी, कमाल तापमान ४२.८° से., कमान तापमान ८.४° से. एवढे असते. असमान पाऊसमान, कमी पावसामुळे आणि शेतकऱ्यांच्या मागणीनुसार या संशोधन केंद्रावर कडधान्य व तेलबिया पिकांच्या विशेषतः चवळी पिकाचे संशोधन हाती घेण्यात आले आहे आणि आजपर्यंत चवळी पिकाच्या ४ जाती फुले पंढरी, फुले विठाई, फुले रखुमाई आणि फुले सोनाली येथून प्रसारित करण्यात आल्या आहेत. तसेच २४ पेक्षाही जास्त संशोधन शिफारशी कोरडवाहू शेतीसाठी प्रसारित करण्यात आल्या असून त्या शेतकरी उपयोगात आणत आहेत.

५.	मंजुर पदांचा तपशील

अ. क्र.	पदनाम	एकूण मंजूर पद	भरलेली पदे	रिक्त पदे	शेरा
१	सहाय्यक प्राध्यापक (कृषि वनस्पतीशास्त्र)	०१	०१	००	
२	सहाय्यक प्राध्यापक (उद्यान विद्या)	०१	००	०१	
३	सहाय्यक प्राध्यापक (कृषि वनस्पती विकृतीशास्त्र)	०१	००	०१	
४	वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कीटक शास्त्र)	०१	००	०१	
५	वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कृषि विस्तार शिक्षण)	०१	००	०१	
६	कृषि सहाय्यक	०३	०३	००	ज्वारी सुधार प्रकल्प राहुरी येथे ०१ सेवसंचित
७	वरिष्ठ लिपिक	०१	०१	००	
८	लिपिक नि टंकलेखक	०१	०१	००	
९	शिपाई	०१	००	०१	
१०	पहारेकरी	०१	०१	००	
११	जीप चालक	०१	००	०१	
	एकूण	**१३**	**०७**	**०६**	

६. संशोधन योजना / केंद्रामार्फत राबविण्यात आलेले वैशिष्ट्यपुर्ण उपक्रम:

- कार्यालयाला नियमित वीज पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र विद्युत डीपी बसविण्यात आली.
- कार्यालयीन बिल्डिंगची दुरुस्ती करण्यात आली.
- कार्यालयीन आणि अतिथीगृहाची विद्युत दुरुस्ती करण्यात आली.
- विहीरीचा गाळ काढून कठडा बांधण्यात आला.
- संशोधन केंद्राच्या समोरील बाजूस १०० मीटर तारांचे कुंपण करण्यात आले.
- मुख्य गेटवर कमान बसविण्यात आली.
- बोअरवेल ला ७.५ hp सौर पंप बसविण्यात आला.
- कार्यालयाजवळ व अंतर्गत रस्त्यांना ३ सौर हाय मास्ट बसविण्यात आले.
- संशोधन केंद्राचा महसूल वाढीसाठी विविध उत्पादक चाचणी प्रयोग घेण्यात येतात.
- स्वंयचलीत हवामान केंद्राची स्थापना करण्यात आली.
- प्रत्येक हंगामामध्ये शेतकरी मेळावे, शेतीशाळा, शेतीदिन, प्रशिक्षण वर्ग, प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी भरविण्यात येते.

७.	**संशोधन योजना / केंद्रामार्फत विकसित / प्रसारीत करण्यात आलेले वैशिष्टयपुर्ण सुधारीत / संकरीत वाण, कृषि तंत्रज्ञान** या केंद्राने चवळी पिकाचे फुले पंढरी, फुले विठाई, फुले रखुमाई आणि फुले सोनाली असे चार वाण विकसीत करून शेतकऱ्यांसाठी प्रसारित करण्यात आले आहेत. विविध वाणांचे मुल्यांकन कार्यक्रमामुळे गेल्या पाच वर्षात कृषि हवामान क्षेत्रासाठी विविध पिकांच्या खालील वाणांचे प्रकाशन आणि शिफारसी करण्यात आल्या. १) हरभरा - फुले विश्वराज (२०२०) ३) मटकी - फुले सरिता (२०२०) ४) उडीद - फुले वसू (२०२१) ५) उडीद - फुले राजन (२०२३) ६) तुर - फुले तृप्ती (२०२३)
८.	**संशोधन योजना / केंद्रामार्फत प्रसारीत करण्यात आलेले वैशिष्टयपुर्ण कृषि संशोधन शिफारशी** ➢ नीरा लाभ क्षेत्रातील शेवटच्या टोकाला पाणी पोहचणे खरीप आणि उन्हाळी हंगामात अनिश्चित असते. अशा ठिकाणी तुर- तुर (खोडवा) - चाऱ्यासाठी बाजरी किंवा खरीप न पेरता - रब्बी ज्वारी - उन्हाळी भुईमूग अशी पीक पद्धती शिफारस केली आहे. ➢ भीमा आणि नीरा लाभ क्षेत्रासाठी दोन पीक पद्धती खरीप भुईमूग आणि रब्बी ज्वारी, चवळीनंतर ज्वारी किंवा खरीप सूर्यफूल नंतर रब्बी ज्वारी पेरण्याची शिफारस केली आहे. ➢ भीमा आणि नीरा लाभ क्षेत्रासाठी जिथे रब्बी ज्वारी प्रमुख पीक आहे तिथे ज्वारीनंतर मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात K-४-११ या पसऱ्या किंवा ICGS-११ अथवा UF-७०१०३ अशा निमपसऱ्या किंवा एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात फुले प्रगती या भुईमुगाच्या उपट्या जातीची उन्हाळ्यात लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे. ➢ करडई पिकाच्या भीमा वाणाला ३०-३५ दिवसांनी, फुलावर असतांना ६०-६५ दिवसांनी आणि दाणे भरतांना ८०-९० दिवसांनी या नाजुक अवस्थाना संरक्षित पाणी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. ➢ सुधारित लागवड तंत्रज्ञान वापरतांना दोन पाणी देण्याची सोय असल्यास पेरणीनंतर ३५ आणि ७० दिवसांनी तसेच फक्त एकच पाण्याची सोय असल्यास पेरणीनंतर ३५ दिवसांनी हरभरा पिकासाठी पाणी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. ➢ भीमा आणि नीरा लाभ क्षेत्रासाठी मोहरी पिकाचे अधिकच्या उत्पादनासाठी ८० किलो नत्र अधिक ३० किलो स्फुरद देण्याची शिफारस करण्यात येत आहे. ➢ भीमा आणि नीरा लाभ क्षेत्रासाठी जमिनीचा चांगला पोत टिकून राहण्यासाठी खरीप सोयाबीन किंवा भुईमूग पिकानंतर रब्बी ज्वारी पिकाची शिफारस करण्यात येत आहे. ➢ हरभरा पिकाच्या मर रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी थायरम २ ग्रॅम अधिक कारबेनडजिम २ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येत आहे. ➢ बागायती क्षेत्रासाठी तुर पिकामध्ये भुईमुगाच्या दोन ओळी आंतरपीक म्हणून घेतल्यास अधिक आर्थिक फायदा होतो. ➢ तुर पिकामध्ये सूर्यफूलच्या दोन ओळी आंतरपीक घेतल्यास अधिक आर्थिक फायदा होतो.

	➢ बागायती क्षेत्रासाठी खरीप भुईमुगाची पेरणी करतांना प्रती हेक्टर २ किलो बोरॉन दिल्यास उत्पादनात ७-८ टक्के वाढ दिसून येते. ➢ ओलीताखाली हरभऱ्याचे उत्पादन वाढीसाठी रोपांची संख्या हेक्टरी ३.३३ लाख, दोन ओळीतील अंतर ३० सेमी. ठेवून सपाट वाफे पद्धतीने पेरणी केल्यास अधिक उत्पादन मिळाले. ➢ हरभऱ्यासाठी रायझोबियम जिवाणू खतांचा वापर केला असता २०% उत्पादनात वाढ आढळून आली. त्याचप्रमाणे नत्र खतांचे मात्रेमध्ये ५० टक्के बचत होते.
९.	**पुढील संशोधनाची दिशा** ➢ चवळीचे लवकर पक्व होणारा, जास्त उत्पादन देणारा, उभट वाढणारा, बुटका, कीड रोग प्रतिकारक आणि वेगवेगळ्या पीक पद्धतीत येणारे वाण विकसित करणे ➢ चवळी पिकाच्या विविध वाणांचे संवर्धन आणि जोपासना करून निवड पद्धतीने उन्नत वाण विकसित करणे ➢ चवळी पिकाच्या विविध जातींचे संकर करणे, त्याच्या पिढ्यांचा अभ्यास करणे आणि नवीन वाण निर्मिती करणे ➢ कडधान्य व तेलबियांचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने मूलभूत संशोधन करणे ➢ कडधान्य व तेलबिया पिकांचे मूलभूत आणि पायाभूत बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे ➢ एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनाचे संशोधन करणे ➢ कडधान्य व तेलबिया पिकांचे कीड व रोगांचा अभ्यास करून संशोधन करणे ➢ भीमा व नीरा लाभ क्षेत्रातील फळपिके, भाजीपाला व फुलझाडे पिकांचे उत्पादन वाढीसाठी मूलभूत संशोधन करणे
१०.	**संशोधन योजना / केंद्राच्या सुधारणेसाठी / बळकटीकरणासाठी आवश्यक असलेले उपाय** ➢ या केंद्रावर एक जुना ट्रॅक्टर आहे. प्रभावी शेती मशागतीसाठी एक नविन ट्रॅक्टरची गरज आहे. ➢ या केंद्रावर कायम आस्थापनेवर मजूर पद मंजुर नाही प्राधान्याच्या आधारावर तीन ते चार कायम आस्थापनेवर मजूर पदे भरण्याची गरज आहे. ➢ या केंद्राच्या आतील शेत रस्त्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. ➢ संशोधन आणि बिजोत्पादन कार्यक्रम राबविणेसाठी सिंचनाची पुरेशी सोय उपलब्ध नाही. कायमस्वरूपी सिंचनाची सोय उपलब्ध व्हावी. ➢ या केंद्रात ५० टक्के रिक्त पदे आहेत. तांत्रीक अधिकारी प्राधान्याने भरणे आवश्यक आहे. ➢ शेततळ्याचा प्लॅस्टिक कागद फाटल्यामुळे पाणी साठवता येत नाही. त्यासाठी नवीन प्लॅस्टिक कागद टाकणे गरजेचे आहे.
११.	**संशोधन योजना / केंद्राचे ऐतिहासिक नाविण्यपुर्ण ठळक घडामोडीचे क्षणचित्रे / फोटो** सोबत जोडले आहेत.